**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 01/09/2026

**आरोपी लोकसेवक** :- श्री.भारत यशवंत राऊत,वय 35 वर्षे पद:- ऑपरेटर, NCMC Smart Card वितरण केंद्र, एस.टी.बसस्थानक, गंगापुर ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर. यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे पत्नी,मुलगी व बहीण यांचे NCMC कार्ड काढण्यासाठी प्रति कार्ड मागे 250/- रु प्रमाणे एकुण- 1000/- रूपये लागतील असे सांगुन 204/- लाचेची मागणी करुन दोन कार्डचे एकुण शुल्क 398/- रूपये होत असतांना तक्रारदार यांचे कडुन प्रति कार्ड 250/- रूपये प्रमाणे दोन कार्डची एकुण रक्कम 500/- रूपये स्वत: स्वीकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| अ.क्र | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | घटक | छत्रपती संभाजीनगर |
| 2 | तक्रारदार | पुरुष, वय 42 वर्षे व्यवसाय - पत्रकार |
| 3 | आरोपी | श्री.भारत यशवंत राऊत,वय 35 वर्षे पद:- ऑपरेटर, NCMC Smart Card वितरण केंद्र, एस.टी.बसस्थानक, गंगापुर ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर. |
| 4 | तक्रार | दिनांक 27/08/2026 रोजी तक्रारदार यांनी त्यांचे पत्नी,मुलगी व दोन बहिणी यांचे एस.टी महामंडळाचे प्रवास सवलतीचे NCMC Smart Card काढण्यासाठी बसस्थानक येथे शासकीय सवलतीचे नियमानुसार प्रतिकार्ड 199/- रूपये एवढेच शुल्क आकारणे बंधनकारक असतांना देखील सदर ऑपरेटर हे 250/- रूपये प्रति कार्ड प्रमाणे शुल्क मागत आहे. तरी सदर ऑपरेटर चार कार्ड मागे 204/- रूपयेची लाच मागत असल्याची खात्री झाल्याने व ती देण्याची ईच्छा नसल्याने लेखी तक्रार दिली. |
| 5 | तक्रारीची पडताळणी | दि. 27/08/2026 रोजी पडताळणी दरम्यान तक्रारदार हे NCMC Smart Card वितरण केंद्र, एस.टी.बसस्थानक, गंगापुर ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर येथे त्यांची पत्नी मुलगी व बहीणी यांचे साठी NCMC Smart Card काढण्या करीता प्रति कार्ड मागे 250/- रूपये प्रमाणे एकुण -1000/- रूपये लागतील असे सांगुन 204/- रूपयांची लाच मागणी करून स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केल्याचे निष्पन्न झाले. |
| 6 | सापळा कार्यवाही | दि. 01/09/2026 रोजी तक्रारदार हे NCMC Smart Card वितरण केंद्र, एस.टी.बसस्थानक, गंगापुर ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर येथे त्यांची पत्नी व मुलगी यांचे स्मार्ट कार्ड काढण्यासाठी गेले असता आरोपी खाजगी इसम (ऑपरेटर) भारत यशवंत राऊत यांनी दोन कार्डचे NCMC स्मार्ट कार्ड काढण्यासाठी रजिस्ट्रेशन केले व पत्येकी 199/- रूपयांची ऑनलाईन पावती दिली, त्यानुसार दोन कार्डचे एकुण शुल्क 398/- रूपये होत असतांना देखील तक्रारदार यांचे कडुन प्रति कार्ड 250/- रूपये प्रमाणे दोन कार्डची एकुण रक्कम 500/- रूपये पंचासमक्ष स्वता स्वीकारले असता त्यांना रंगहाथ पकडण्यात आले आहे. |
| 7 | गुन्हा रजिस्टर नं./कलम/पोलीस ठाणे/जिल्हा, दिनांक व वेळ | पोलीस ठाणे गंगापुर, ता.गंगापुरा जि.छत्रपती संभाजीनगर येथे कलम 7 (अ) भ्र.प्र.अ 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे. |
| 8 | आरोपी अटक दिनांक व वेळ | आरोपी खाजगी इसम (ऑपरेटर). यांना ताब्यात घेण्यात आले आहे, गुन्हा दाखल होताच अटक नोंद करीत आहोत. |
| 9 | सापळा अधिकारी | श्रीमती प्रतिभा आबुज, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9637774599 |
| 10 | तपास अधिकारी | श्री. अमोल सोनवणे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र.9764555100. |
| 11 | सापळा पथक | पोह/अशोक नागरगोजे ,पो.अं. सचिन बारसे, पो.अं./रामेश्वर गोरे, चा.पो.अं. चांगदेव बागुल, चालक पो.अ/ रामेश्वर ताठे |
| 12 | मार्गदर्शन | श्रीमती माधुरी केदार-कांगणे, पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9011092777<br>श्री. शशीकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9923102205<br>श्री.प्रशांत पवार, प्रभारी पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र.9870145915 |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | ला.प्र.वि मुख्यालय |
|---|---|---|---|
| पत्ता | ला.प्र.वि. कार्यालय, जुने तहसिल कार्यालय, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर, 431001 | ला.प्र.वि. कार्यालय, जुने तहसिल कार्यालय, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर, 4310001 | सर पोचखानवाला मार्ग, वरळी मुंबई-400030 |
| दुरध्वनी क्रमांक 1064<br>व्हॉट्सअप क्रमांक | 0240-2344050<br>7720891064 | 0240-2334045 | 022-24921212 |
| ई-मेल आयडी | dysp.acbcsn@mahapolice.gov.in | spacbaurangabad@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

**(प्रशांत पवार)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**छत्रपती संभाजीनगर**